चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२८ मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# जबरी संभोग करणा—या आरोपीस न्यायालयाचा जबरी दणका.
# थेट १० वर्षे कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन पाटण अंतर्गत रंग लावण्याच्या निमीत्याने घरात घुसुन एका विवाहीत महिलेवर जबरी संभोग करण्या—या आरोपीस २७/०३/२०१९ रोजी चंद्रपुर येथे नव्यानचे नियुक्त झालेले व चंद्रपुर सेशन कोर्ट येथिल प्रमुख न्यायाधिश म्हणुन कार्यभार स्विकारलेले **श्री. श्रीपाद दिग्रसकर, प्रमुख सत्र न्यायाधिश जि. चंद्रपुर यांनी थेट १० वर्षे कारावासाची शिक्षा** ठोठावली.

पोलीस स्टेशन पाटण अंतर्गत दि. ०६/०३/२०१५ चे दुपारी यातिल पिडीत महिला आपल्या घरी असताना **आरोपी नामे हिरामन जंगु उईके** हा अचानक घरात शिरला, होळी सण असल्याने होळीचे रंग लावण्याकरीता आलेला असल्याचे समजुन पिडीत महीला गाफिल राहिली व आरोपीने आपला डाव साधला व पिडीत महिलेलवर जबरी संभोग केला.

पोलीस स्टेशन पाटण येथे घटणेची माहिती मिळताच **तत्कालीन ठाणेदार पो.उपनी अमोल पुरी** यांनी घटणेची शहानिशा करून आरोपीस अटक करून आरोपी विरूध्द अप.क्र. ०३/२०१५ कलम ३७६ (२)एफ. ३२३, ४५२ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद केला व आरोपी विरूद्‌ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २७/०३/२०१९ रोजी **आरोपी नामे हिरामन जंगु उईके वय २९ वर्षे, रा. पाटण, ता. जिवती, चंद्रपुर यास १० वर्षे कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ वर्ष कारावास अशी शिक्षा श्री. श्रीपाद दिग्रसकर, प्रमुख सत्र न्यायाधिश जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणाचा तपास तत्कालीन ठाणेदार **पोउपनी श्री. अमोल पुरी** यांनी पुर्ण केला तर सरकार तर्फे **ॲड. प्रशांत घट्टुवार, सरकारी अभियोक्ता, चंद्रपुर यांनी युक्तीवाद केला. तर कोर्ट पैरवी म्हणुन नापोका बाबा गरजे, पोस्टे पाटण** यांनी काम पाहिले.

---